# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:30.07.2026** **वार:गुरुवार**

1. पेपर फुटीप्रकरणी कठोर कारवाईची तरतूद असलेलं सार्वजनिक परीक्षा अनुचित मार्ग प्रतिबंध सुधारणा विधेयक, काल लोकसभेत मंजूर
2. देश व्यसनमुक्त करण्याच्या उद्देशाने पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या रविवारी 'नशा मुक्त युवा विकसित भारत संकल्प अभियान' मोहिमेचा प्रारंभ करणार
3. गुजरात, बिहार आणि मध्यप्रदेश या तीन राज्यातील 3 विधानसभेच्या जागांसाठी आज पोटनिवडणूक आणि
4. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत पॅरा ॲथलॅटिक्स मध्ये पुरुषांच्या 100 मीटर धावण्याच्या स्पर्धेत भारतीय खेळाडूंची सुवर्ण आणि रौप्य पदकाची कमाई

**लोकसभा**

पेपर फुटीप्रकरणी कठोर कारवाईची तरतूद असलेलं सार्वजनिक परीक्षा अनुचित मार्ग प्रतिबंध सुधारणा विधेयक काल लोकसभेत मंजूर झालं. या विधेयकावरच्या चर्चेदरम्यान देशातली शिक्षण व्यवस्था अतिशय महाग झाल्याचं विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सांगितलं. यावेळी त्यांनी काही असंसदीय शब्दांचा वापर केल्याचं सांगत सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी गोंधळ घातला आणि त्यांच्या भाषणात अडथळे आणले. आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांवर झालेल्या हिंसाचाराचे आदेश कोणी दिले यासंदर्भात राहुल गांधी यांनी केलेल्या दाव्यांवरुनही सत्ताधाऱ्यांनी आक्षेप घेतला. या विधेयकावरच्या चर्चेला उत्तर देताना केंद्रीय राज्यमंत्री जितेंद्र सिंग यांनी विधेयकातल्या कठोर तरतुदींचा पुनरुच्चार केला. तसंच विरोधी पक्षांनी केलेले आरोप फेटाळले. दोन वर्षांपूर्वी मंजूर झालेल्या कायद्याच्या अंतर्गत पेपरफुटी प्रकरणी 52 गुन्हे दाखल झाल्याची माहिती त्यांनी दिली. सत्ताधारी आणि विरोधकांच्या गोंधळातच हे विधेयक मंजूर झालं आणि त्यानंतर सभापती ओम बिर्ला यांनी सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब केलं. राज्यसभेत काल वंदे मातरम या राष्ट्रीय गीताला जन गण मन या राष्ट्रगीताप्रमाणे सन्मान देण्याची तरतूद असलेलं विधेयक मंजूर झालं. याअंतर्गत वंदे मातरमचा अवमान करणाऱ्यांनाही 3 वर्षांपर्यंत शिक्षा आणि दंड अशी तरतूद आहे.

**राष्ट्रपती**

छत्तीसगडमधील बस्तर दसरा उत्सवात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या विविध आदिवासी समुदायांचे प्रतिनिधी आज राष्ट्रपती भवनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेणार आहेत. 164 सदस्यांच्या या शिष्टमंडळात परगणा, मांझी, चालकी, समुदाय प्रमुख, 'बस्तर पांडुम'शी संबंधित प्रसिद्ध आदिवासी युवा कलाकार, आदिवासी समुदायांचे प्रतिनिधी आणि बस्तरमधील पद्म सन्मानार्थीचा समावेश आहे. यावेळी छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णू देव साय हे देखील उपस्थित राहणार आहेत.

**अभियान**

विकसित भारत 2047 च्या संकल्पनेला बळ देण्यासाठी आणि देश व्यसनमुक्त करण्याच्या उद्देशाने पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या रविवारी, 2 ऑगस्ट रोजी नशा मुक्त युवा विकसित भारत संकल्प अभियान' या मोहिमेचा प्रारंभ करणार आहेत. युवक आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी काल ही माहिती दिली. अंमली पदार्थांच्या व्यसनाधीनतेविरुद्धची ही 100 आठवड्यांची देशव्यापी 'लोकचळवळ मोहीम असेल. या मोहिमेच नेतृत्व 'माय भारत' या ऑनलाइन प्लॅटफॉर्मद्वारे केल जाईल. तरुणांना नेतृत्व करण्यासाठी सक्षम आणि सक्रिय बनवण्याच्या उद्देशाने चालवले जाणारे हे एक ऑनलाइन 'युवा नेतृत्व आणि सामाजिक सहभाग' व्यासपीठ आहे.

**मुख्यमंत्री**

मुंबईत ड्रग्ज फ्री मुंबई अभियानाची सुरुवात आजपासून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात होणार आहे. कौशल्य, उद्योजकता मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या पुढाकाराने वरळी इथं या अभियानाचं आयोजन करण्यात आलं आहे. अमली पदार्थ मुक्त राज्यासाठी 'ड्रग्स फ्री मुंबई' सारखं अभियान संपूर्ण राज्यात राबवण्यात येईल, मुंबईसह राज्यातील सर्व शाळा आणि महाविद्यालयांमध्ये 'नशामुक्ती मार्गदर्शन आणि समुपदेशन समिती'ची स्थापना केली जाईल असं लोढा यांनी सांगितलं.

**गोयल**

देशात होणारे नवसंशोधन, उच्च तंत्रज्ञान, स्टार्टअप, लघु आणि माध्यम उद्योग याद्वारेच भारताच्या पुढील टप्प्यातील आर्थिक विकासाला गती मिळेल अस मत केंद्रीय उद्योगमंत्री पीयूष गोयल यांनी व्यक्त केल. नवी दिल्लीत आयोजित 22 व्या जे आर डी टाटा श्रुती व्याख्यानात ते काल बोलत होते. ते पुढ म्हणाले की जागतिक स्तरावर मेड इन इंडिया नावाने ओळखल्या जाणाऱ्या  भारतीय उत्पादनांनी स्पर्धा आणि गुणवत्ता याबाबततीत विश्वासर्हता प्राप्त करून महत्वाच स्थान निर्माण करण्याची आवश्यकता आहे. यासाठी केंद्र सरकारने अनेक महत्वाची पावल उचलली असून, त्यात संशोधन विकास आणि नवोन्मेष साठी 1 लाख कोटींच्या निधीची तरतूद, तसच भारताच ए आय धोरण आणि सेमिकंडक्टर धोरण यांचा समावेश असल्याच गोयल यांनी यावेळी सांगितल.

**पोटनिवडणूक**

गुजरात, बिहार आणि मध्यप्रदेश या तीन राज्यातील 3 विधानसभेच्या जागांसाठी आज पोटनिवडणूक होत असून सकाळी 7 वाजल्यापासून मतदानाला सुरुवात झाली आहे. बिहार मधील बांकीपूर, मध्यप्रदेश मधील दतीया आणि गुजरात मधील मंजल पूर विधानसभा जागेसाठी ही पोट निवडणूक होत आहे भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांची राज्यसभेवर निवड झाल्याने बिहार मधील बांकीपूर विधानसभा जागेसाठी पोटनिवडणूक होत असून तो भाजपचा बालेकिल्ला मानला जातो. तिन्ही जागांच्या निवडणुकीचे निकाल 3 ऑगस्ट ला जाहीर होणार आहेत .

**साखर-कारखाने**

बिहार सरकारने दरभंगातील रायम आणि मधुबनी इथल्या साक्रीतील बंद पडलेले साखर कारखाने पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री सम्राट चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली काल झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत यासंदर्भातील प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली.

**कावड-यात्रा**

उत्तर भारतातील श्रावण महिन्यातील वार्षिक 'कांवड यात्रा' आजपासून सुरू होत आहे. या यात्रेदरम्यान, गंगा नदीचं पवित्र जल आणण्यासाठी मोठ्या संख्येने भाविक उत्तराखंडमधील हरिद्वार, गौमुख आणि गंगोत्री यांसारख्या तीर्थक्षेत्रांना भेट देतात. भाविकांची मोठी गर्दी लक्षात घेऊन उत्तराखंड आणि उत्तर प्रदेश सरकारांनी व्यापक सुरक्षा व्यवस्था केली आहे. उत्तर प्रदेशात, कांवड घेऊन जाणारे यात्रेकरू आणि इतर प्रवाशांच्या सुरळीत प्रवासासाठी अनेक जिल्ह्यांमध्ये वाहतुकीचे मार्ग बदलण्यात आले आहेत.

**भुकंप-जपान**

जपानमधील भूकंपात मृत्यूमुखी पडलेल्यांची संख्या आता 18 झाली आहे. अद्यापही बचाव आणि शोधकार्य सुरू आहे. किमान 62 लोक जखमी झाले असून अनेक लोक अजूनही बेपत्ता आहेत. 7 पूर्णांक 1 रिश्टर तीव्रतेचा हा भूकंप क्युशू बेटावरील कुमामोटो प्रांतात झाला, त्यामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं आहे. जपान मधील लष्कर आणि बचाव पथकं ढिगार्यांखाली गाडल्या गेलेल्या नागरिकांचा शोध घेत आहेत. सुमारे 35 हजार घरांमधील वीजपुरवठा आणि सुमारे 15 हजार घरांमधील पाणी पुरवठा खंडीत झाला आहे. 8 हजार पेक्षा जास्त लोकांनी आपत्कालीन शिबिरांमध्ये आश्रय घेतला आहे. या भुकंपामुळे जपानमधील विमान तसंच वाहतूक व्यवस्था प्रभावीत झाली असून ती सुरळीत करण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत.

## राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा

ग्लासगो इथ सुरू असलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत काल पुरुषांच्या पॅरा ॲथलॅटिक्स मध्ये 100 मीटर टि-47 स्पर्धेच्या अंतिम फेरीत भारतीय खेळाडूंनी सुवर्ण आणि रौप्य पदकाची एकाच वेळी कमाई करत इतिहास रचला आह . भारताच्या दिलीप महादू गावीत याने सुवर्णपदक तर मोहम्मद बासिल मोरसिंगानकथ याने रौप्य पदकाची कमाई केली. तत्पूर्वी पुरुष गटाच्या लांब उडी स्पर्धेत भारताच्या मुरली श्री शंकर याने रौप्य पदक पटकावल. या स्पर्धेत दोनदा पदक जिंकणारा तो पहिला भारतीय खेळाडू ठरला आहे. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत आतापर्यंत भारताने 3 सुवर्ण 9 रौप्य आणि 3 कास्य पदक अशी एकंदर 15 पदक जिंकून पदक तालिकेत 8 वा क्रमांक मिळवला आहे.

## पूरस्थिति

ओडिशामध्ये मुसळधार पाऊसामुळे नद्यांच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. पूरस्थितीमुळे चौघांचा मृत्यू झाल्याचं वृत्त आहे. आतापर्यंत एकंदर चार लाख नागरिकांना पूरस्थितीचा फटका बसला आहे. प्रशासनाकडून मदत आणि बचावकार्य युद्धपातळीवर सुरु आहे. महानदीच्या पाणलोट क्षेत्रात सतत पडत असलेल्या पावसामुळे पूरस्थिती गंभीर होण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. आसामच्या काही भागांत पुढील तीन ते चार दिवसांत मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. अरुणाचल प्रदेश आणि नागालँडमध्ये होणाऱ्या या मुसळधार पावसाचा परिणाम आसाममधील सीमावर्ती जिल्ह्यांवर होण्याची शक्यता आहे. आज दिवसभरांत मध्य महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशातील काही ठिकाणी तसंच, राजस्थानचा काही भाग, गुजरात, हिमाचल प्रदेश, केरळ, माहे, कर्नाटक, मराठवाडा, पंजाब, उत्तराखंड आणि विदर्भाच्या काही भागांत मुसळधार पावसाची शक्यता आहे

# याबरोबर हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल, नमस्कार.